# मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे आयोजित 'वन महोत्सव'

## अहवाल

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे च्यावतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक प्राध्यापक, प्रशासकिय कर्मचारी व विद्यार्थी एकूण ९५ जनांच्या सहकार्याने कडूलिंब, विलायती चिंच, देशी चिंच, रेनट्री, जांभूळ, आवळा, बेहडा, शिवण, करंज इत्यादी प्रकारची एकूण १६० वृक्ष रोपांची लागवड **दिनांक ०५ जुलै २०१७ रोजी दुपारी ०२:०० वा. मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय कुळे, दखणे, पौड, पुणे येथे** करण्यात आली.

या वेळी पुणे विभाग नोडल अधिकारी प्राचार्य डॉ. संजय खरात (मॉडर्न महाविद्यालय, **गणेशखिंड, पुणे)** यांनी महाराष्ट्र शासन वनविभाग अंतर्गत ०१ जुलै ते ०७ जुलै हा वनमहोत्सव सप्ताह अंतर्गत यावर्षी वनमहोत्सवा मध्ये सुमारे ०४ कोटी वृक्षरोपन करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. असे उपक्रम शाळा, महाविद्यालय पातळीवर राबविल्याने वृक्षारोपणाचे विविध प्रयोग करणे, नवनवीन वृक्ष जातीचा अभ्यास करणे, त्याचे औषधी फायदे समाजाला पटवून देणे सोईचे होईल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वृक्ष लागवडीत सहभागी करून घेतल्याने त्यांच्यावर चांगले संस्कार होतील. असे विचार यावेळी मांडले.

प्राचार्य प्रा. डी. एस. काजळे (मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन करताना वृक्षवल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे आपण केलेल्या वृक्ष रोप लागवडीची आपल्या नातेवाईका प्रमाणे ते आपले सोयरे आहेत असे मत त्यांनी व्यक्त करून वृक्ष लागवडीसाठी आलेल्या सर्वांचे स्वागत केले शिक्षक व विद्यार्थ्यांचे विशिष्ट गट तयार करून वृक्ष लागवडीचा आराखडा स्पष्ट केला.

वृक्षारोपणासाठी मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे वेगवेगळे भाग करण्यात आले. कॉलेज गेट ते मेन बिल्डींग यामध्ये सावली देणारे वृक्ष व फुल झाडे लावण्यात आली. औषधी वनस्पतींसाठी खास वेगळा भाग करण्यात आला.

कडूलिंब-२०, विलायती चिंच-१०, देशी चिंच-२५, रेनट्री-१३, जांभूळ-३७, आवळा-१२, बेहडा-१३, शिवण-२०, करंज-५ एकूण-१६० अशी भरपूर ऑक्सीजन देणारी व हवा स्वच्छ करणारी झाडे सगळीकडे विखरून लावण्यात आली. जिथे रोपे लावली आहेत ती जागा कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची असल्याने त्या रोपांची निगा विद्यार्थी राखतील व त्यांची काळजी घेऊन त्यांना वाढविण्यात येईल.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. संजय खरात, कार्यालयीन अधिक्षक श्री रेणूसे यांनी मार्गदर्शन केले आणि कार्यक्रम यशस्वि होण्यासाठी प्रा. कुमूद सपकाळ, प्रा. मोतीलाल मोरे, प्रा. दस्तगीर पठाण, प्रा. मोरेश्वर मिशी , प्रा. डॉ. आबासो शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना व इंडीयन रेड क्रॉस सोसायटीचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

P.E.S.'s Modern College of Arts, Science & Commerce, Ganeshkhind, Pune-53

प्राचार्य
Principal
Modern College of Arts, Science & Commerce, Ganeshkhind, Pune



वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदतेवेळी स्वयंसेव तसेच प्राचार्य प्रा. डी. एस. काजळे (मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय), प्रा. मोतीलाल मोरे, प्रा. दस्तगीर पठाण, प्रा. डॉ. आबासो शिंदे



प्राचार्य डॉ. संजय खरात (मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे) व प्राचार्य प्रा. डी. एस. काजळे (मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय) तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक




प्राचार्य डॉ. संजय खरात चिंचेचे रोप लाऊन पाणी देतेवेळी श्री राजकुमार हगवणे , डॉ. आबासो शिंदे व एन. एस. एस. स्वयंसेवक विद्यार्थी



प्राचार्य प्रा. डी. एस. काजळे (मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय) मार्गदर्शन करताना प्रा. मोतीलाल मोरे व उपस्थित प्राध्यापक